**दिवाणी चौकशी अर्ज क्र.१६४०/२०२२**

श्री. मोहन पानकन इधाथारा व १
वि.
कोणीही नाही

**आदेश निशाणी क्र.१ वर**

१. प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यासोबत सादर केलेले कागद वाचले. अर्जदार यांचे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जावर निशाणी १ यावर आदेश पारित करीत असल्याने सदर अर्जातील मजकूर पुनर्लिखित करीत नाही.

३. प्रस्तुत अर्ज दाखल केलेनंतर जाहिरनामा व जाहिर नोटीस जारी करण्याचा आदेश पारीत करण्यात आला. पुढे नमूद केल्याप्रमाणे जाहिरनामा व जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| जाहिरनामा | प्रसिध्द दिनांक ०१/०२/२०२३ | निशाणी क्रमांक ०७ |
| जाहिर नोटीस वृत्तपत्र किल्ले रायगड | प्रसिध्द दिनांक २६/०१/२०२३ | निशाणी क्रमांक १९ |

४. जाहिरनामा व जाहिर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर मुदतीत किंवा आजपर्यंत प्रस्तुत अर्ज कथनास कोणीही व्यक्तींनी हरकत घेतलेली नाही.

५. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करणेस कारण या न्यायालयाचे कार्यकक्षेत घडलेले आहे. मयत सुजाथा

मोहन इधाथारा यांचा कामोठे, पनवेल या ठिकाणी मृत्यू झाला आहे. मयताची मिळकत या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात आहे. प्रस्तुत प्रकरण हे केवळ मयत व्यक्तीचे वारसप्रमाणपत्र संबंधी आहे.

६. अर्ज कथनाचे पुष्टयर्थ अर्जदारांनी शपथेवर पुरावा सादर केलेला आहे. अर्जदारांनी सादर केलेला पुरावा खालील प्रमाणे

| निशाणी क्रमांक | कागदपत्रे |
|---|---|
| ०९ | अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र. |
| १३ | सुजाथा मोहन इधाथारा यांचे मृत्यू प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| १४ | दिनांक २९-०४-२०१० रोजीचे दस्त क्र.पवल-३-४३४४-२०१० कडील साठेकरारपत्राची पडताळणी केलेली प्रत. |
| १५ | सुजाथा मोहन इधाथारा यांचे नावे असलेले रॉयल हाईटस को.ऑप.हौ. सो. लि. मधील सदनिकेचे शेअर सर्टिफिकेट |
| १६, १७ | अर्जदारांच्या आधारकार्डच्या सत्यप्रती. |
| १८ | अर्जदारांची रेशनकार्डची सत्यप्रत. |

७. वरील पुरावा यावरुन असे दिसते की, सुजाथा मोहन इधाथारा मयत दिनांक ०८-०९-२०१६ यांचे अर्जदार क्र.१ व २ असे वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे, करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## :: **आदेश** ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत सुजाथा मोहन इधाथारा यांचे अर्जदार क्र.१ श्री. मोहन पानकन इधाथारा-पती व अर्जदार क्र.२ सुमोद मोहन इधाथारा-मुलगा असे कायदेशीर वारस आहेत

असा दाखला आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यावर देण्यात यावा.

३. निशाणी १ या आदेशाचा भाग समजणेत यावे.

पनवेल,
दिनांक : १३-०६-२०२३.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.